गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांचेकडुन उलटतपास सरकारी वकील एस. एस. सुर्यवंशी यांचेकडुन शपथेवर सुरु -

१. माझे शिक्षण दहावीपर्यंत झालेले आहे. ज्यावेळेस तलाव झाला त्यावेळेस मला समजत होते. हे म्हणणे खरे आहे की, ज्यावेळेस तलाव झाला त्यावेळेस भूसंपादन अधिकारी, मोजणी अधिकारी आमच्या शेतात आले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस भूसंपादन अधिकारी, मोजणी अधिकारी यांनी माझेकडे व लगतच्या शेतक-यांकडे प्रचलीत भावाप्रमाणे चौकशी केली. हे म्हणणे खरे नाही की, माझे शिवारातील गट क्र. १५६/१ माझ्या जमिनीपासुन जवळ आहे. त्या जमिनीबाबत दि. १४.०९.२००५ रोजी प्रति हेक्टर १५९५७/- रुपये प्रमाणे खरेदी विक्रीचा व्यवहार झाला याबाबत मला माहिती आहे. त्या खरेदीखताचे अवलोकन भूसंपादन अधिकारी यांनी ॲवार्ड करते वेळी केले याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस जमीन संपादीत केली त्यावेळेस माझ्या जमिनीमध्ये झाडे व इतर स्ट्रक्चर नव्हते. हे म्हणणे खरे नाही मी, माझ्या जमिनीमध्ये झाडे नसल्यामुळे ई-स्टेटमेंन्ट मध्ये त्याची नोंद नाही. साक्षीदार स्वत: सांगतात की, त्याची सातबा-यावर नोंद आहे. हे म्हणणे खरे नाही की, जास्तीचा मावेजा मिळण्याकरीता मी जास्तीचे झाडे दाखवलेली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या जमिनीमधील झाडांची कोणत्याही शासकीय अधिका-याकडुन तपासणी करून मुल्यांकन करून घेतले नाही. ज्यावेळेस माझी जमीन संपादीत केली त्यावेळेस त्या जमिनीचा भाव एकरी सात लाख रुपये होता असा दर्शविणारा पुरावा मी भूसंपादन अधिकारी यांना दिला. माझी जमीन बागायत असल्याबाबत मी कागदोपत्री पुरावा दाखल केलेला आहे. मी ऊसाच्या पावत्या दाखल केलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझी जमीन संपादीत करतेवेळी बागायत होती हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. २५९ सिंदफळ शिवार ही जमीन बागायत असून माझे जमीनीपासुन तीन ते चार कि.मी. अंतरावर आहे. हे म्हणणे खरे नाही की, शासनाने मला प्रचलीत बाजार भावाप्रमाणे चौकशी करून योग्य मावेजा दिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी जास्तीचा व अवाढव्य मावेजा मिळणेकरीता अर्ज दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझा दावा मुदतीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, जास्तीचा मावेजा मिळण्याकरीता मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

AWASEKAR SWATI DILIPRAO
Digitally signed by AWASEKAR SWATI DILIPRAO
Date: 2025.05.08 16:35:22 +0530

दिनांकः ०६.०५.२०२५

(श्रीमती. एस. डी. अवसेकर )
दिवाणी न्यायाधीश, व स्तर, तुळजापूर.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P. D.F. file judgment/order/issues/ evidence are same, word to word, as per the original judgment/order/issues/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Devidas S. Shiral,<br>Stenographer - Grade II |
| Court | --- | Smt. S.D. Awasekar<br>Civil Judge, Senior Division, Tuljapur, District - Dharashiv. |
| Date | --- | 06/05/2025 |
| Judgment/order/issues/evidence signed by the Presiding Officer on | --- | 06/05/2025 |
| Judgment/order/issues/ evidence uploaded on | --- | 08/05/2025 |